शेतकऱ्यांच्या वीज तक्रारींसाठी महावितरणची २४X७ हेल्पलाईन; मोबाईल ॲपवरूनही नादुरुस्त रोहित्राची तक्रार शक्य

प्रतिनिधी

नागपूर : दुष्काळसदृश परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांच्या वीजविषयक तक्रारींचे तातडीने निराकरण करण्यासाठी महावितरणने विशेष व्यवस्था केली आहे. नागपूर जिल्ह्यात रोहित्र (ट्रान्सफॉर्मर) बिघाडासह इतर तातडीच्या वीजविषयक तक्रारींची नोंद घेऊन त्यावर आवश्यक कार्यवाही करण्यासाठी ७८७५७६१०० हा हेल्पलाईन क्रमांक २४ तास, सातही दिवस उपलब्ध करण्यात आले आहेत. यासोबतच नादुरुस्त किंवा बंद पडलेल्या रोहित्राची माहिती महावितरण मोबाईल ॲप आणि महावितरण संकेतस्थळाद्वारे एका क्लिकवर नोंदविण्याची सुविधाही उपलब्ध आहे.

शेतीसाठी सुरळीत वीजपुरवठा महत्त्वाचा असल्याने रोहित्र बिघाडामुळे वीजपुरवठा खंडित झाल्यास त्याची तातडीने दखल घेणे आवश्यक आहे. ही बाब लक्षात घेऊन महावितरणने तक्रार निवारणासाठी समन्वय यंत्रणा कार्यान्वित केली आहे. हेल्पलाईनवर प्राप्त होणाऱ्या तक्रारींची नोंद घेऊन नागपूर जिल्ह्यातील संबंधित महावितरण अधिकारी व कर्मचाऱ्यांशी समन्वय साधण्यात येणार आहे, जेणेकरून बिघाड दूर करण्यासाठी आवश्यक कार्यवाही करता येईल.

मोबाईल ॲपवरून एका क्लिकमध्ये रोहित्र बिघाडाची नोंद

नागपुर जिल्ह्यातील शेतकरी तसेच सर्वसामान्य वीजग्राहकांना नादुरुस्त किंवा बंद पडलेल्या रोहित्राची माहिती थेट महावितरण मोबाईल ॲप द्वारे देण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. महावितरणचे नागपूर जिल्ह्यात तब्बल १ लाख ४५ हजार १५६ कृषी ग्राहक असून ६ हार ५०० पेक्षा अधिक सिंगल फेज वितरण रोहित्रे आहेत. यापैकी बहुतांश रोहीत्रांचे जिओ-लोकेशनसह मॅपिंग पूर्ण झाले आहे. त्यामुळे संबंधित रोहित्राचे अचूक ठिकाण निश्चित करून त्याच्या बिघाडाची माहिती देणे अधिक सुलभ झाले आहे.

या सुविधेचा वापर करण्यासाठी ग्राहक क्रमांकाद्वारे लॉगिन करता येते किंवा गेस्ट म्हणूनही तक्रार नोंदविता येते. तक्रार नोंदविताना संबंधित रोहित्राच्या ठिकाणाजवळ असणे, मोबाईलचे लोकेशन सुरू ठेवणे आणि ॲपला लोकेशनची परवानगी देणे आवश्यक आहे.

ॲपमधील नादुरुस्त रोहित्राची माहिती नोंदवा हा पर्याय निवडून आवश्यक माहिती भरावी, संबंधित रोहित्राचा फोटो काढावा आणि नोंदणी पूर्ण करावी. ही माहिती संबंधित अभियंता व जनमित्रांपर्यंत पोहोचल्याने रोहित्राची तपासणी करून आवश्यक दुरुस्ती किंवा बदल करण्यासाठी कार्यवाही करता येते. तक्रारीवरील कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर तक्रारदाराला व्हॉट्सॲपद्वारे माहिती देण्याची सुविधाही उपलब्ध आहे.

वेबसाईट आणि टोल फ्री क्रमांकावरूनही ही सुविधा

मोबाईल ॲपव्यतिरिक्त महावितरणच्या www.mahadiscom.in या अधिकृत संकेतस्थळावर, संबंधित महावितरण कार्यालयात किंवा ग्राहक सुविधा केंद्रातही तक्रार नोंदविता येते. तसेच महावितरणच्या २४ तास सुरू असलेल्या कॉल सेंटरच्या १८००२१२३४३५, १८००२३३३४३५, १९१२ आणि १९१२० या क्रमांकांवर संपर्क साधण्याची सुविधा उपलब्ध आहे. संकेतस्थळ तसेच मोबाईल ॲपवरील ऊर्जा चॅटबॉट द्वारेही मराठी आणि इंग्रजी भाषेत तक्रारी नोंदविता येतात.

नादुरुस्त रोहित्राची माहिती वेळेत मिळाल्यास संबंधित यंत्रणेला बिघाडाचे ठिकाण शोधणे आणि दुरुस्ती किंवा रोहित्र बदलण्याची कार्यवाही करणे अधिक सुलभ होते. त्यामुळे शेतकरी व वीजग्राहकांनी रोहित्र बिघाड किंवा इतर तातडीच्या वीजविषयक समस्यांसाठी उपलब्ध हेल्पलाईन, मोबाईल ॲप, संकेतस्थळ किंवा टोल फ्री क्रमांकांचा वापर करावा, असे आवाहन महावितरणतर्फे करण्यात येत आहे.

नवरात्रोत्सव व धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या तात्पुरत्या वीजजोडणीसाठी 'प्रीपेड स्मार्ट मीटर' बंधनकारक

प्रतिनिधी

नागपुर : आगामी नवरात्रोत्सव, दुर्गापुजा, गरबा महोत्सव तसेच दीक्षाभूमीवरील ५६ व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या पार्श्वभूमीवर सार्वजनिक मंडळे, अन्नदान व विविध धार्मिक-सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी तात्पुरती वीजजोडणी घेणे अधिक सुलभ करण्यात आले आहे.

यावर्षी सर्व प्रकारच्या तात्पुरत्या वीजजोडणीसाठी महावितरणतर्फे 'प्रीपेड स्मार्ट मीटर' बसवणे पूर्णपणे बंधनकारक करण्यात आले आहे. त्यामुळे आयोजकांना आपल्या गरजेनुसार मोबाईल रिचार्जप्रमाणे आधी रक्कम भरून वीज वापराचा लाभ घेता येणार आहे. ऐन उत्सवाच्या काळात वीजपुरवठ्याची कोणतीही अडचण निर्माण होऊ नये, यासाठी आयोजकांनी व ग्राहकांनी महावितरणच्या अधिकृत संकेतस्थळावर किंवा मोबाईल ॲपद्वारे वेळेत ऑनलाईन अर्ज सादर करावेत, असे आवाहन महावितरण नागपूर परिमंडलातर्फे करण्यात आले आहे.

धार्मिक व सामाजिक उत्सवांचा उत्साह द्विगुणित करताना वीजपुरवठा अधिक पारदर्शक व जलद गतीने उपलब्ध व्हावा, या उद्देशाने महावितरणने विशेष तयारी केली आहे. परिपूर्ण ऑनलाईन अर्ज प्राप्त झाल्यानंतर संबंधित मंडळाला अवघ्या ४८ तासांच्या आत तात्पुरती वीजजोडणी मंजूर करून दिली जाणार आहे. गतवर्षी नागपूर परिमंडलात तब्बल ८० हून अधिक नवरात्रोत्सव व दुर्गापूजा मंडपांना अधिकृत तात्पुरता वीजपुरवठा करण्यात आला होता. यावर्षी देखील मोठ्या संख्येने अर्ज येण्याची शक्यता गृहीत धरून महावितरणची सर्व यंत्रणा सज्ज झाली आहे. उत्सव काळात वीजपुरवठ्याबाबत कोणत्याही अचानक उद्भवणाऱ्या तांत्रिक अडचणींवर तत्काळ मात करण्यासाठी आणि ग्राहकांना अखंडित सेवा देण्यासाठी महावितरणकडून विशेष व्यवस्था करण्यात येणार आहेत.

मंडपातील भव्य देखावे, मनमोहक विद्युत रोशणाई, ध्वनिक्षेपक, गरबा प्रांगण, महाप्रसाद तसेच धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त विविध ठिकाणी आयोजित परित्राण पाठ व अन्नदान कार्यक्रमांसाठी वीज वापरताना सुरक्षेची काळजी घेणे अत्यंत आवश्यक आहे. अनेकदा अनधिकृत वीजजोडणी, सदोष किंवा उघडी वायरिंग, तसेच मंजूर भारापेक्षा अधिक विद्युत उपकरणांचा अचानक वापर केल्याने शॉर्ट सर्किट होऊन अपघाताचा गंभीर धोका निर्माण होतो. यामध्ये जीवित व वित्तहानी होण्याची मोठी शक्यता असते. त्यामुळे सर्व आयोजक मंडळांनी कोणत्याही प्रकारची अनधिकृत वीजचोरी किंवा धोकादायक जोडणी न करता महावितरणकडून रीतसर तात्पुरती वीजजोडणी घ्यावी आणि सुरक्षित वीज वापराच्या सर्व नियमांचे तंतोतंत पालन करून महावितरणला सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

शेतीचे अतोनात नुकसान, शेतकऱ्याची गळफास घेऊन आत्महत्या, मारडा येथील घटना



प्रतिनिधी

चंद्रपूर : शेतातील पिकांचे झालेले अतोनात नुकसान आणि डोक्यावर असलेल्या कर्जाच्या आर्थिक विवंचनेतून चंद्रपूर शहरालगत असलेल्या मारडा येथील एका शेतकऱ्याने झाडाला गळफास लावून आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना गुरुवारी सकाळी उघडकीस आली. मनीष रघुनाथ माकोडे (४५ रा. मारडा तालुका चंद्रपूर)असे आत्महत्या केलेल्या शेतकऱ्याचे नाव आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, यंदा राज्यात दुष्काळी परिस्थिती निर्माण झाल्यामुळे शेतीचे प्रचंड नुकसान झाले आहे. शासनाकडून दुष्काळसदृश परिस्थिती जाहीर करून नुकसानग्रस्त शेतीचे पंचनामे करण्याचे आदेश प्रशासनाला देण्यात आले आहेत. मात्र, मनीष माकोडे यांच्या शेतात झालेली पिकांची हानी अतिशय मोठी होती.

हे अतोनात नुकसान भरून निघणे अशक्य असल्याचे दिसत असल्याने ते गेल्या काही दिवसांपासून प्रचंड मानसिक तणावात व आर्थिक संकटात होते. पिकांचे झालेले नुकसान आणि त्यातून निर्माण झालेल्या आर्थिक विवंचनेतूनच त्यांनी हे टोकाचे पाऊल उचलल्याची प्राथमिक चर्चा ग्रामस्थांमध्ये आहे. गुरुवारी सकाळी गावातील नागरिक शेताकडे जात असताना गावानजीक असलेल्या शेतपरिसरातील एका झाडाला मनीष माकोडे हे गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आले. याबाबतची माहिती चंद्रपूर शहर पोलिसांना देण्यात आली. शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक श्याम गव्हाणे यांनी आपल्या चमूसह तातडीने घटनास्थळ गाठून पंचनामा केला व मृतदेह शवविच्छेदनासाठी रुग्णालयात पाठवला.

या दुर्दैवी घटनेमुळे दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या व्यथा आणि त्यांच्या समोरील गंभीर प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आले आहेत. प्रशासनाने केवळ पंचनाम्यांचे सोपस्कार न उरकता पीडित शेतकरी कुटुंबाला तातडीने भरीव आर्थिक मदत द्यावी आणि दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे गांभीर्याने लक्ष द्यावे, अशी तीव्र भावना स्थानिक नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे. पुढील तपास ठाणेदार श्याम गव्हाणे यांच्या नेतृत्वात सुरू आहे.

'तू पोलीस झाली म्हणून मोठी शहाणी झालीस का?', महिलेला सासू, नणंद आणि मोठ्या दिराने केली मारहाण

महिला पोलिसची पोलिस ठाण्यात तक्रार...



प्रतिनिधी

चंद्रपूर : चंद्रपुरातील लालपेठ कॉलनीत एक धक्कादायक प्रकार पुढे आला आहे. तू पोलीस झाली म्हणून काय मोठी शहाणी झाली का? असा टोमणा मारत सासू, नणंद आणि मोठ्या भासरा मिळून या महिला कर्मचाऱ्याला आणि तिच्या पतीला बेदम चोप दिला व जिवे मारण्याची धमकी दिली. शनिवारी, ३ ऑक्टोबर रोजी सायंकाळी हा राडा घडला. याप्रकरणी चंद्रपूर शहर पोलिसांनी आरोपी भासरा मनिष रामभाऊ पेटकर, नणंद श्वेता गोपाल कोसरे आणि सासू निता रामभाऊ पेटकर या तिघांविरुद्ध बीएनएस २०२३ च्या कलम २९६, ११५ (२), ३५२, ३५१ (२) आणि ३(५) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

रिटायरमेंटच्या पैशांची वाटणी बनले वादाचे कारण

तुकूम येथील पोलिस क्वार्टरमध्ये राहणाऱ्या सोनल संतोष पेटकर (वय ३७) या पोलिस विभागात कार्यरत आहेत. त्यांच्या सासू निता पेटकर या डब्ल्यूसीएल विभागात नोकरीवर होत्या व ३० सप्टेंबर रोजी त्या सेवानिवृत्त झाल्या. शनिवारी सासूने आपल्या मुलाला (सोनल यांच्या पतीला) फोन करून "रिटायरमेंटच्या पैशांची चार भागांत वाटणी केली आहे, पैसे नेण्यासाठी घरी ये" असे सांगून लालपेठ कॉलरीतील निवासस्थानी बोलावले. त्यानुसार सोनल पेटकर या पतीसह सासूच्या घरी गेल्या.

पोलीस महिलेच्या पतीलाही मारहाण

सोनल आणि त्यांचे पती सासूच्या घरी पोहोचताच तिथे हजर असलेली नणंद श्वेता कोसरे हिने भावाला "तू कशाला इथे आला?" असे म्हणून त्याचे शर्ट पकडून मारहाण करण्यास सुरुवात केली. यावर सोनल यांनी मध्यस्थी करत "माझ्या नवऱ्याचा शर्ट का ओढते?" असा जाब विचारला. त्याच वेळी तिथे हजर असलेला सोनल यांचा मोठा भासरा मनिष रामभाऊ पेटकर याने अतिशय अश्लील शिवीगाळ करत "तू पोलीस झाली तर मोठी शहाणी झाली का? थांब तुला पण रिपोर्ट देऊन अडकवतो" अशी धमकी देऊन त्यांना धक्काबुक्की केली.

केस धरून खाली पाडले; हाताबुक्यांनी बेदम मारहाण

त्यानंतर वाद विकोपाला गेला. नणंद श्वेता कोसरे आणि सासू निता पेटकर यांनी सोनल यांचे केस पकडून त्यांना जमिनीवर खाली पाडले आणि हाताबुक्यांनी बेदम मारहाण केली. एवढेच नव्हे तर सासू, नणंद आणि मोठ्या भासऱ्यानेही सोनल यांच्या पतीलाही बेदम मारहाण करत जिवे मारण्याची धमकी दिली. या भीषण हल्ल्यातून सुटका झाल्यानंतर पीडित महिला पोलीस सोनल पेटकर यांनी तत्काळ चंद्रपूर शहर पोलिस ठाणे गाठून आपबिती कथन केली व तोंडी तक्रार नोंदवली. त्यांच्या तक्रारीवरून तिघांविरुद्ध गुन्हा नोंदवला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास साहाय्यक पोलिस उपनिरीक्षक गणपती वाढई करत आहेत.

'नवऱ्यासह घरावर संकट'ची केली बतावनी... आणि मग भोंदूबाबने केले असे...अंधश्रद्धेच्या आडून फसवणुकीचा धक्कादायक प्रकार



प्रतिनिधी

चंद्रपूर : ब्रह्मपुरी तालुक्यातील गांगलवाडी येथे एक धक्कादायक प्रकार समोर आला असून, 'तुमच्या नवऱ्याला आणि घराला मरेपट लागली आहे' अशी भीती दाखवत एका भोंदूबाबाने महिलेकडून तब्बल ९८ हजार रुपये उकळल्याचा प्रकार उघडकीस आला. या प्रकरणी गांगलवाडी येथील संध्या मनोहर मशाखेत्री (वय ३५) यांनी ब्रह्मपुरी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली.

फसवणूक झाल्याचे आले लक्षात

तक्रारीच्या आधारे पोलिसांनी संबंधित भोंदूबाबाविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ३१८(४) अन्वये गुन्हा दाखल केला. मिळालेल्या माहितीनुसार, संबंधित व्यक्तीने पीडित महिलेला तिच्या कुटुंबावर संकट असल्याचे सांगत विविध प्रकारची भीती दाखवली. या भीतीपोटी महिलेने त्याच्यावर विश्वास ठेवला. त्यानंतर धार्मिक विधी आणि अन्य कारणे सांगून तिच्याकडून तब्बल ९८ हजार रुपये घेण्यात आले. मात्र, पैसे दिल्यानंतरही कौटुंबिक समस्या दूर न झाल्याने आपली फसवणूक झाल्याचे महिलेच्या लक्षात आले. त्यानंतर तिने पोलिसात धाव घेत तक्रार दाखल केली.

पोलिसात धाव घेत तक्रार दाखल

ब्रह्मपुरी तालुक्यातील गांगलवाडी परिसरात १९ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी दोन अनोळखी व्यक्ती भिक्षा मागण्यासाठी आल्याची माहितीही समोर आली आहे. त्यामुळे सांगून तिच्याकडून तब्बल ९८ हजार रुपये घेण्यात आले. मात्र, पैसे दिल्यानंतरही कौटुंबिक समस्या दूर न झाल्याने आपली फसवणूक झाल्याचे महिलेच्या लक्षात आले. त्यानंतर तिने पोलिसात धाव घेत तक्रार दाखल केली.

भिक्षा मागण्यासाठी आले होते भोंदूबाबा

याच परिसरात १९ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी दोन अनोळखी व्यक्ती भिक्षा मागण्यासाठी आल्याची माहितीही समोर आली आहे. त्यामुळे गाव परिसरात अनोळखी व्यक्तींच्या हालचालींबाबत नागरिकांमध्ये चिंता व्यक्त होत आहे. फसवणूक करणाऱ्या भोंदूबाबांवर कठोर कारवाई करून अशा प्रकारांना आळा घालावा, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. विशेषतः सणासुदीच्या दिवसांमध्ये गावागावांत असे भोंदूबाबा फिरत असून, अशांपासून सावध राहणे गरजेचे आहे.

अशा बाबांपासून सावध राहावे

कुठल्याही अशा बाबांकडे अलौकिक शक्ती नसते,जे असा दावा करतात.त्यांना अडकावण्यासाठी महाराष्ट्र शासनाने जादूटोना विरोधी कायदा २०१३ लागू केलेला आहे. जे बाबा असा दावा करीत असतील त्यांची तक्रार पोलिसात करावी, अशा बाबांपासून प्रत्येक नागरिकांनी सावध रहावे.

-हरीभाऊ पाथोडे,राज्य संघटक, अखिल भारतीय अंधश्रद्धा

लवकरच आरोपींना ठोकणार बेड्या

या घटनेचा गुन्हा नोंदविण्यात आला असून तपास सुरू आहे. लवकरच आरोपींना बेड्या घालण्यात येतील. ग्रामीण भागात अंधश्रद्धा, भीती आणि अज्ञानाचा आधार घेत आर्थिक फसवणुकीचे प्रकार घडत असल्याने नागरिकांनी सतर्क राहावे. आजारपण किंवा कौटुंबिक अडचणींवर अघोरी उपाय, मरेपट अथवा बाधेच्या नावाखाली पैसे मागणाऱ्या व्यक्तींची माहिती तातडीने पोलिसांना द्यावी.

-कांचन पांडे, पोलिस निरीक्षक, ब्रह्मपुरी

...तर, तातडीने पोलिसांशी संपर्क साधावा

आजारपण किंवा कौटुंबिक अडचणींचा फायदा घेत भीती निर्माण करणाऱ्या व्यक्तींपासून नागरिकांनी सावध राहण्याची गरज आहे. 'भरेपट', 'बाधा', 'अघोरी उपाय' किंवा धार्मिक विधीच्या नावाखाली मोठ्या रकमेची मागणी करणाऱ्या व्यक्तींवर विश्वास ठेवू नये. अशा प्रकारची फसवणूक होत असल्यास तातडीने पोलिसांशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

नानांच्या निधनाने लहान भाऊ गमावला

प्रकाश आमटे यांनी व्यक्त केल्या शोकसंवेदना

प्रतिनिधी

गडचिरोली : ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांच्या निधनाने आमच्यासाठी आणि आमच्या कुटुंबासाठी ही व्यक्तिगत हानी आहे. नानांनी बाबा आमटे यांना आपले वडीलच मानले होते. आमच्या कुटुंबाशी त्यांचे अतिशय घनिष्ठ आणि जिव्हाळ्याचे संबंध होते. माज्यासाठी नाना केवळ अभिनेते नव्हते, तर ते माझे लहान भाऊच होते, अशा शब्दांत प्रसिद्ध समाजसेवक डॉ. प्रकाश आमटे यांनी नाना पाटेकर यांच्या निधनावर शोक व्यक्त केला.

डॉ. आमटे म्हणाले की, माझा बायोपिक तयार होत असताना नाना तब्बल एक महिना हेमलकसात राहिले होते. या काळात ते आमच्या कुटुंबातील सदस्यांमध्ये अगदी सहज मिसळून गेले होते. माज्या सुना आणि नातवंडांसोबत ते खेळायचे. स्वयंपाकघरात जाऊन त्यांच्यासाठी भाजी करायचे आणि स्वतःच्या हाताने त्यांना खाऊ घालायचे. त्यामुळे आमच्यातील नाते अतिशय जिव्हाळ्याचे होते. नानांच्या जाण्याने आमच्या कुटुंबाचे मोठे नुकसान झाले आहे. ते गेल्याचा अजूनही विश्वास बसत नाही, असे सांगत डॉ. प्रकाश आमटे यांनी नाना पाटेकर यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

दै. भंडारा पत्रिका नियमित वाचा!

जाहीर नोटीस

कोर्ट विद्यमान दिवाणी न्यायाधिश साहेब, कनिष्ठ स्तर लाखनी

एम. जे.सी.नं. ३२/२०२६ **पेशी ता. २०/११/२०२६**

प्रोसेस क्र.११०६/२०२६

अर्जदार :- श्रीमती सविता चंद्रशेखर लांजेवार + २

--विरूध्द--

कुणीही नाही

या नोटीसादवारे सर्व संबंधीतांना नातेवाईकांना कळविण्यात येते की, मृतक चंद्रशेखर सुखदेव लांजेवार हे एन्त हॉस्पीटल चापरी नागपुर (ग्रामीण), नागपुर ला दि. २०/०२/२०२६ ला मरण पावले. मृतक चंद्रशेखर सुखदेव लांजेवार मौजा पिंपळगाव / सडक, ता. लाखनी जि भंडारा येथील रहीवाची होते. मृतक चंद्रशेखर सुखदेव लांजेवार यांच्या मृत्युनंतर अर्जदारांनी कायदेशीर वारसान प्रमाणपत्र (Legal heir Certificate) निळण्याकरीता विद्यमान न्यायालयात प्रकरण दाखल केलेले आहे.

या जाहीर नोटीचादवारे सर्व संबधीतांना नातेवाईकाना कळविण्यात येते की, मृतक चंद्रशेखर सुखदेव लांजेवार यांच्या मृत्युपश्चात अर्जदाराना कायदेशीर वारसान प्रमाणपत्र देण्यास कुमाची उजर तक्रार असल्यास किंवा हरकत असल्यात त्यांनी आपले उजर पेशी तारीख २०/११/२०२६ ला किंवा पेशी तारखेच्या पुर्वी न्यायालयात दाखल करावीव जर अशी कोणतीही हरकत वा उत्तर न्यायालयात दाखल न झाल्यास अर्जदाराना न्यायालयातुन मृतक चंद्रशेखर सुखदेव लांजेवार यांचे वास्त म्हनुन वात्त्वान प्रापत्र मंजुर करण्यात येईन याची नोद घेण्यात यावी.

सबब आज दि.०५/१०/२०२६ रोजी माज्या राही व न्यायालयाच्या शिक्यानिशी हे जाहीर नोटीस देण्यात येत आहे.

दि.०५/१०/२०२६
लाखनी

शिक्का

आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय क. स्तर,लाखनी

जाहीर नोटीस

कोर्ट विद्यमान मान, दिवाणी न्यायाधिश,क.स्तर, साकोली

एम. जे.सी.नं. ३६/२०२६ **पेशी ता. ०७/११/२०२६**

अर्जदार :- रेखा रामकृष्ण ठाकरे, वय ५५ वर्षे, धंदा घरकाम, राह. बिरसा मुंडा चौक, सेंदुरवाफा, तह साकोली, जि भंडारा

--विरूध्द--

गैरअर्जदार :- कुणीही नाही

ज्या अर्थी वरील अर्जदाराचा मुलगा नामे योगेश रामकृष्ण ठाकरे हा उपचारादरम्यान दि. २१/०४/२०२६ ला डिस्ट्रिक्ट हॉस्पीटल, चंद्रपुर, तह जि चंद्रपुर येथे मरण पावला. त्यामुळे अर्जदारानी मृत्तक नामे - योगेश रामकृष्ण ठाकरे याचे अर्जदाराच्या नावे वारस सर्टिफिकेट मिळण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट VIII चे चॅप्टर १ प्रमाणे अर्ज केला आहे.

तरी या अर्जाबाबत कोणाचे उजर, तक्रार वा आक्षेप असल्यास त्यानी दिनाक २३/१०/२०२६ ला सकाळी ११.०० वाजता आवश्यक पुराव्यासह स्वत किंवा वकीलामार्फत आपले म्हणणे न्यायालयात न चुकता सादर करावे आपण जर हजर न राहिल्यास एकतर्फी कारवाई करण्यात येवुन अर्जदाराला वारस सर्टिफिकेट देण्याचा आदेश पारीत करण्यात येईल व त्या नंतर कोणाचीही उजर तक्रार वा आक्षेप विचारात घेतला जाणार नाही. करिता जाहिर नोटीसद्वारे कळविले आहे

सदर जाहिर नोटीस आज दि.०८/१०/२०२६ रोजी माझे सही व कोर्टाचे शिक्क्यानिशि काढण्यात आली.

आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी न्यायालय क. स्तर, साकोली

दि.०८/१०/२०२६
साकोली

शिक्का